**जनसंपर्क अधिकारी**
**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
**Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेसनोट ३०७/२०२२** **दिनांक : ०७/१०/२०२२**

# वाहनचोरी, घरफोडी व चोरीचे ५ गुन्हे उघडकीस करण्यास वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटिकरण पथकास यश.

वालीव पोलीस ठाणे हद्दीतील सतत दिवसा व रात्रीच्यावेळी चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. सदर घटनांच्या अनुषंगाने घटनास्थळावरुन मिळालेल्या माहितीच्या आधारे व तांत्रिक गोष्टींचा अभ्यास करुन तसेच गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्हयांचा तपास करुन आरोपीत नामे १) विकी मंगल वाघरी वय:२८ वर्षे रा. नायगाव पूर्व २) संदेश काताराम जाधव वय:२६ वर्षे रा. नायगाव पूर्व ३) अरबाज अहमद शेख वय:२४ वर्षे रा. नायगाव पूर्व यांना दिनांक ०५/१०/२०२२ रोजी अटक करुन गुन्हे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत यांना विश्वासात घेऊन कौशल्याने विचारपूस केली असता त्यांनी खालील गुन्हयामध्ये त्यांचा सहभाग असल्याचे सांगीतल्याने अटक आरोपीतांकडून मोटार सायकल, रिक्षा, व मोबाईल असा एकुण- १,५४,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | वालीव | गु.रजि.नं I १०५१/२०२२ भादंविस कलम ४५७, ३८०, ५११, ३४ |
| २ | वालीव | गु.रजि.नं I ९०९/२०२२ भादंविस कलम ३७९ |
| ३ | वालीव | गु.रजि.नं I १०४६/२०२२ भादंविस कलम ३७९ |
| ४ | वालीव | गु.रजि.नं I ११०३/२०२१ भादंविस कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ |
| ५ | वालीव | गु.रजि.नं I १०४७/२०२२ भादंविस कलम ३७९, ५११, ३४ |

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -२ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, श्री. मिलींद साबळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, सचिन दोरकर, बाळासाहेब कुटे, पोना/ सतिष गांगुर्डे, पो.अंम.गजानन गरीबे, सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.